RIGHT TO INFORMATION

# व्हर्च्युअल ट्रेझरी, महाराष्ट्र शासन

नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा माळा, संचालनालय लेखा व कोषागारे, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक :- ०२२-२२०४०५६४/५६८ ई -मेल : vtodat.mum-mh@gov.in

क्र : व्हर्च्युअल ट्रेझरी/न.क्र८९/२०२२/१४१ दिनांक : 10/06/2022

विषय : ग्रास प्रणालीद्वारे पेमेंट अ‍ॅक्रॉस बँक कांऊटर (Manual Challan) या विकल्पाद्वारे प्रदान करण्याची किमान मर्यादा रू 300/- वरून रू 50/- इतकी करण्यास मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : १. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. संकीर्ण 1011/प्र.क्र.18/कोषा प्र-5, दिनांक 09.08.2011
2. वित्त विभाग पत्र क्र.संकीर्ण 2020/प्र.क्र.37/कोषा प्रशा-4, दिनांक 25.08.2020

परिपत्रक

माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून शासनाकडे जमा होणारा महसूल व महसूलेत्तर रकमा इलेट्रोनिक पध्दतीने शासन खाती जमा करता याव्यात याकरिता शासनाने सन 2010 पासून ग्रास प्रणाली कार्यविन्त केली आहे.

शासनाच्या संदर्भ क्र 1 च्या परिपत्रकान्वये रू.300/- पेक्षा कमी रकमेचे चलन बँकांनी न स्विकारण्याबाबत सूचना दिल्या आहेत.त्यामुळे ग्रास प्रणालीद्वारे पेमेंट अक्रॉस द बँक काउंटर या विकल्पाचा वापर करून रक्कम प्रदान करण्याची किमान मर्यादा रू.300/- ठेवण्यात आली.

संदर्भ क्र. 2 च्या पत्रान्वये शासनाने ग्रास प्रणालीद्वारे पेमेंट अ‍ॅक्रॉस बँक काऊंटर (Manual Challan) या विकल्पाद्वारे प्रदान करण्याची किमान मर्यादा रू.300/- वरून रू.50/- इतकी करण्यास शासन मान्यता प्रदान केली आहे.

याद्वारे सर्व बँकांना सूचित करण्यात येते की किमान रू.50/- इतक्या मर्यादेचे ग्रास प्रणालीद्वारे पेमेंट अ‍ॅक्रॉस बँक काऊंटर (Manual Challan) या विकल्पाद्वारे तयार कलेले चलन स्विकारण्यात यावे.

(चित्रलेखा खातू)
कोषागार अधिकारी,
व्हर्च्युअल ट्रेझरी,म.रा.मुंबई.
व्हर्च्युअल ट्रेझरी

प्रती
सर्व बँक